तरन्नुमने मला कोड्यात टाकले. श्रीमंतीचे उत्तान प्रदर्शन करणाऱ्या तिच्या लोखंडवालामधल्या घरावर इन्कम टॅक्सवाल्यांची धाड पडली तेव्हा तिने अगदी लाजून चूर होत जो बुरखा घातला होता, त्यातून तिचे डोळेच तेवढे जगाला दिसू शकत होते. मी जिला ओळखत होते, ती तरन्नुम कुणी वेगळीच होती. त्यावेळी ती एकदम नटवी नार होती; चमचमणारा "सूट", अंगावर खरेखोटे दागिने, रंगवलेला चेहरा, अशी ती ८,५०० चौ. फूट जागेच्या बदनाम दीपा बारच्या एका खाजगी खोलीत तेव्हाच्या एका हिट गाण्याच्या तालावर काय लचकत होती. तिच्या हालचाली अगदी हेतुपुरस्सर मादक होत्या.

मधूनच एखादी वाहवा ऐकू यायची आणि पाठोपाठ करकरीत नव्या नोटा हवेत उडायच्या. बारमध्येच जन्म घेतल्यासारखे दिसणारे दोन पुरुष, समोर प्रेक्षक म्हणून बसले होते दोन तास झाले तरी हे चालूच राहिल्यावर त्यांना हे अजून का हवंय हे मला कळेना. भिन्नलिंगी संबंध ठेवणाऱ्या मध्यमवयीन पुरुषांचे समाधान कशाने होते, हे भिन्नलिंगी संबंध ठेवणाऱ्या बाईला कधीच कळणार नाही. मात्र ती हे का करतेय, हे मला माहीत होते. तिला तिच्या कुटुंबाला पोसायचे होते. शिवाय तिच्या स्वत:च्या अशा काही महत्त्वाकांक्षा होत्याच.

# बारबाला होण्याचे

— स्मृती कोप्पीकर



# ओझे

२००३-२००४ च्या सुरूवातीला, मी रोझी, डॉली, जहानारा आणि उमराव जान यांना भेटले होते. बायका अनेक, नावे तीच. आम्ही तर बोलून चालून बारबाला, त्या म्हणाल्या होत्या. तिथल्या डान्स फ्लोअरच्या बाहेर त्यांना खरी नावे होती, त्यांचेही सगळ्यांसारखे एक जग होते जिथे त्यांना इतरांप्रमाणे सांसारीक कामे होती, मातापित्यांची काळजी घ्यायची होती, मुलांना किंवा भावंडांना "इंग्लिश" शाळेत शिकवायचे होते, वाण्याशी हुज्जत घालावी लागत होती, घरभाड्याबाबतीत घासाघीस करणे भाग पडत होते, दारुड्या आणि / अथवा त्यांच्यावरच अवलंबून असलेल्या नवऱ्याभोवती रूंजी घालावी लागत होती आणि मधुर भांडारकरच्या "चांदणी बारमधल्या" तब्बूचे त्यांचे आयुष्य चितारणारे काम बघून नाक मुरडायचे होते किंवा खिदळायचे होते.

ज्या गाण्यांच्या तालावर त्या नाचत होत्या, ती गाणीसुद्धा त्यातल्या काहींना आवडत नव्हती. कित्येकांना त्यांच्या कामाचे जग आवडत नव्हते, तरीही त्या दिवस ढकलत होत्या. एखादे गिऱ्हाइक जास्त लाडात येऊ लागले की त्या मॅनेजरला खूण करत आणि तो येऊन नियमांचे पालन होण्याची खबरदारी घेत असे. पहिला नियम म्हणजे, "नुसतं बघायचं, हात लावायचा नाही", त्या हसून म्हणाल्या. हा नियम मोडण्याची मुभा असलेल्या स्पेशल खोल्या असलेले काही बार होते आणि त्यासाठी तत्पर असणाऱ्याही काही जणी होत्या. पोलिसांचे त्यांना काही वाटत नव्हते, पोलीस आपलेच होते, त्याहीपेक्षा जास्त काही होते. मीडियाचा मात्र त्यांना तिरस्कार वाटे कारण धाड पडल्यावर पेपरवालेच त्यांची ओळख जाहीर करत असत.

"मी जणू या जगाचा चेहरा आहे." कितीतरी रोझी किंवा डॉली यांनी तक्रार केली, पण याच चेहऱ्याने स्वतःला नीतिरक्षक मानणाऱ्या महाराष्ट्राच्या आमदारांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांनी डान्स बारवर आक्षेप घ्यायला सुरुवात केली. समाजधुरिणांनी याच चेहऱ्याला सोयीस्करपणे गुन्हेगारीसाठी जबाबदार ठरवले. या संपन्न शहराच्या कित्येक समस्यांच्या मागे हा चेहरा आहे, असे गृहमंत्री आर. आर. पाटील आम्हाला म्हणाले.

पंचतारांकित व चार तारे असलेली हॉटेले सोडून बाकी ठिकाणचे डान्स बार म्हणजे मुंबईच्या जीवनाला, मुंबईच्या शांतता व सुरक्षितता यांना लागलेला कलंक होय, असे म्हटले जाऊ लागले. जे, जे, म्हणून वाईट होते, ते सगळे बारमध्ये नाचणारणींच्या नावावर चढवले गेले. बारबालांच्या डोक्यावर आधीच अनेक बोजे होते, त्यात ही भर पडली.

आपल्यासारख्या मध्यवर्गीयांना तरन्नुममध्ये भौतिक ऱ्हास आणि नैतिक पतन, यांचे दर्शन झाले. पण तरन्नुम तर केवळ एका षड्यंत्राचे दृष्य रूप होती. या षड्यंत्रांची पाळेमुळे समाजात खोलवर रुजलेली आहेत आणि त्यातून अनेक जण बेशरमपणे नफा कमावत आहेत. त्यातील बहुतेक सगळे पुरुषच आहेत. त्यातल्या काही जणांचे तर वरपर्यंत लागेबांधे आहेत. अविश्वसनीय प्रभाव व शक्ती आहे.

विचार करा, भरपूर कमावून बसलेले बारमालक, मिळालेल्या माहितीनुसार, दर महा १० ते १२ लाखांच्या घरात, असे म्हणतात. आपल्या बारच्या एका कोपऱ्यात ते कुण्या देवीचा पुतळा बसवतात आणि त्याला फुले वाहून त्याच्या पुढ्यात धूप जाळतात.

विचार करा, पोलीसवाले, बारच्या परवान्याचे नियमन करणे आणि बेकायदा बार बंद करणे, हे त्यांचे काम. पण त्याऐवजी ते बनले बिनपैशाची गिऱ्हाइके आणि बारबालांना त्यांनी बनवले संशयित गुन्हेगारांना जाळ्यात पकडण्याची साधने. ते तर बारचे बिनभांडवली भागीदारच होऊन गेले.

विचार करा, राजकारणी, लोकांसमोर या बार्सना शिव्या घालणार पण एखादी रात्र तिथे काढायला यांची ना नाही. बारमालकांना मित्र मानून संरक्षण पुरवायला तयार. खरे तर बार म्हणजे त्यांची दडवलेली कौटुंबिक गुंतवणूकच. विचार करा, व्यवसायीक, कारखान्यांचे मालक, आयात-निर्यात करणारे आणि इतर पुरुष; जे असल्या बारला आपली मनोराज्ये प्रत्यक्षात जगण्याची जागा समजतात.

विचार करा, वास्तवदर्शनाच्या मागे लागलेले सिनेमावाले आणि पटकथाकार. इथे जे पहायला मिळाले त्याने हादरून गेलेले लेखक आणि कवी; पण यांच्यात बायका नाहीच. या बारमधले मॅनेजर, वेटर, बाउन्सर्स. मेकअप मेन, शिंपी आणि हरकामे. दर रात्री सणसणीत धंदा करणारे टॅक्सी आणि रिक्षाचालक.

नैतिकतेचा बडेजाव आणि गुन्हेगारीचा धोका हे दोन्ही बुरखे बाजूला केले, की आतली डान्स बारची अर्थव्यवस्था दृष्टीस पडते. आर. आर. पाटीलांनी जेव्हा डान्स बारवर बंदी आणली, तेव्हा ही अर्थव्यवस्था नाहीशी झाली नाही, ती भूमिगत झाली. यात सर्वाधिक नुकसान कोणाचे झाले? या अर्थव्यवस्थेचा चेहरा बनलेल्या बारबालेचे, तिने दोन्ही साहिले, कामाचे ओझे आणि समाजाचा निर्णय, या जगातल्या तरन्नुम, रोझी आणि डोली यांच्यासाठी ही बंदी म्हणजे वाईटातली वाईट गोष्ट ठरली. गुन्हेगारीचा आलेख वर चढण्यामागे त्या नव्हत्या. त्यांचा काम करण्याचा हक्क त्यांना परत मिळणे, हे योग्यच आहे.



# डान्सबार बंदीवरून सरकारला पुन्हा दणका

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

महाराष्ट्रातील डान्सबार बंदी उठवण्याचे आदेश दिले असतानाही त्याची अंमबजावणी न करणाऱ्या राज्य सरकारला सुप्रीम कोर्टाने गुरुवारी पुन्हा दणका दिला. आपल्या आदेशाचे पालन करण्याचे निर्देश देत बारमालकांच्या परवान्यांबाबत दोन आठवड्यात निर्णय घ्या, असे कोर्टाने राज्य सरकारला बजावले.

न्या. दीपक मिश्रा आणि पी. सी. पंत यांनी खंडपीठाने हे निर्देश दिले. डान्सबार बंदी आणण्यासाठी महाराष्ट्र सराकरने केलेली कायदादुरुस्ती मुंबई हायकोर्टाने १२ एप्रिल २००६ मध्ये रद्द ठरवली होती. त्याला राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. मात्र, १६ जुलै २०१३ मध्ये सुप्रीम कोर्टाने 'जगण्यासाठी कमावण्याचा हक्क अबाधित आहे', असे म्हणत हायकोर्टाचा निर्णय कायम ठेवला होता. मात्र, राज्य सरकार परवाने देत नसल्याने बारमालकांच्या संघटनेने पुन्हा सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

## कोर्टाचा सन्मान पण, डान्सबारला विरोधच

**नागपूर:** डान्सबार बंदीबाबत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा आम्ही सन्मान करतो पण, बंदी कायम राहावी, यासाठी गरज पडल्यास कायद्यात बदल करण्याची बाब तपासण्यात येईल, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केली. विधिमंडळाने डान्सबार बंदीचा कायदा केला होता. यासंदर्भात आणखी कुठले कायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत ते तपासू, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.